लोकमत

# स्पॉटलाईट

शिवाजी विद्यापीठाची स्थापना कोल्हापुरात १९६२ मध्ये तत्कालीन राष्ट्रपती सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या हस्ते झाली. तेव्हा या विद्यापीठाच्या क्षेत्रात कोल्हापूर, रत्नागिरी, सांगली, सातारा, सोलापूर हे जिल्हे असावेत अशी योजना होती; पण रत्नागिरी मुंबई विद्यापीठाकडेच राहिला आणि सोलापूर जिल्हा सोलापूर विद्यापीठाकडे गेला. त्यामुळे कोल्हापूर, सांगली आणि सातारा असे तीनच जिल्हे या विद्यापीठ क्षेत्रात येतात. या विद्यापीठाचा ५४ वा दीक्षांत समारंभ सोमवार, दि. १९ रोजी होत आहे. या समारंभाचेही वेगळे वैशिष्ट्य आहे, त्यानिमित्त हा प्रकाशझोत.

Hello Kolhapur
Page No. 8 Mar 15, 2018
Powered by: erelego.com

लोकमत

# नव्या क्षितिजाकडे झेपावण्यास सिद्ध

## देवानंद शिंदे : देशाला दिली लाखो उच्चविद्याविभूषित तरुणांची देणगी



शिवाजी विद्यापीठाने गेल्या ५५ वर्षांच्या वाटचालीत नेहमीच विद्यार्थिभिमुख धोरण ठेवले आहे. स्थापनेपासून ते आजतागायत या विद्यापीठाने ग्रामीण भागातील लाखो उच्चविद्याविभूषित तरुणांची देणगी देशाला दिली आहे. केवळ विद्यार्थीच नव्हे, तर शिक्षक आणि प्रशासकीय सेवक यांच्याही क्षमतावृद्धी व विकासासाठी शिक्षण, प्रशिक्षण व सुसाध्य

संतोष मिठारी

प्रयोगशीलतेला प्राधान्य देऊन या साऱ्या घटकांच्या एकात्म, एकदिशा प्रयत्नांतून विद्यापीठ विकासाच्या नव्या क्षितिजाकडे झेपावण्यास सिद्ध होत आहे, असे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी सांगितले.

कुलगुरु डॉ. शिंदे म्हणाले, महाराष्ट्राचा ग्रामीण भाग समजल्या जाणाऱ्या पश्चिम महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याच्या हेतूने शिवाजी विद्यापीठाची दि. १८ नोव्हेंबर १९६२ रोजी स्थापना झाली. विद्यापीठाच्या 'कमवा आणि शिका' योजनेद्वारे आर्थिक कुवत नसलेले विद्यार्थीसुद्धा उच्च शिक्षण घेऊ शकले. पुढे त्यांतील काही कुलगुरु, तर काही बॅरिस्टरही झाले. अभ्यासक्रमांत कालसुसंगत बदल करीत आणि वेळोवेळी नवनव्या, अद्ययावत अभ्यासक्रमांची निर्मिती करीत विद्यापीठाने सातत्याने विविध विषयांमधील आपली आघाडी, प्रगती वेळोवेळी सिद्धही केली आहे. त्यामुळे विद्यापीठाचे विद्यार्थी जगभरात आपल्या प्रतिभेचा ठसा उमटवीत आहेत. आजच्या आणि यापुढील काळात संशोधन व विकास, कौशल्य शिक्षण, तंत्रज्ञान आणि व्यवस्थापन या चतु:सूत्रीचाच आधार घेऊन विद्यार्थ्यांमध्ये क्षमतांचा विकास करण्यावर भर द्यावा लागणार आहे. त्यासाठी विद्यापीठाने इंडो-जर्मन टूल रुम (आयजीटीआर), गुगल या संस्थांशी केलेल्या सामंजस्य करारांच्या माध्यमांतून विद्यार्थ्यांना खूप मोलाची मदत होणार आहे. रायगड, पन्हाळा पदभ्रमंतीसारख्या उपक्रमांतून सांस्कृतिक वारशाच्या जाणिवा विकसित होऊन त्यापुढील पिढ्यांत प्रवाहित होत राहतील.

### युरोपियन युनियनसमवेत संयुक्त सहकार्य प्रकल्प

आंतरराष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेला आपल्या विद्यार्थ्यांना सामोरे जावे लागणार असल्याचे भवितव्य लक्षात घेऊन तशा प्रकारच्या आत्मविश्वासाची निर्मिती त्यांच्या ठायी करण्यासाठी विद्यापीठ प्रयत्नशील आहे. त्या दृष्टीने युरोपियन युनियनसमवेत हाती घेण्यात आलेला संयुक्त सहकार्य प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा ठरणार असल्याचे कुलगुरु डॉ. शिंदे यांनी सांगितले. ते म्हणाले, भारतीय उच्च शिक्षण व्यवस्थेत गुणवत्तेचे आंतरराष्ट्रीयीकरण करण्याच्या आणि आपल्या विद्यार्थ्यांत नेतृत्वगुण विकसित करण्याच्या दृष्टीने हा प्रकल्प उपयुक्त ठरणार आहे. त्यासाठी अत्यंत दर्जेदार साधनांची निर्मिती करुन गुणवत्तेला वेगळा आयाम देण्याचा प्रयत्न आहे.




# दीक्षांत समारंभाचे बदलते स्वरुप

दीक्षांत समारंभ किंवा पदवीदान समारंभ हा विद्यार्थ्यांच्या जीवनातील एक अतिशय महत्त्वाचा आणि आनंदाचा भाग असतो. पदवी प्राप्त करण्यासाठी घेतलेले कष्ट, त्यासाठी दिलेल्या परीक्षा या सर्वांची फलप्राप्ती म्हणजेच पदवीदान किंवा दीक्षांत समारंभ. अलीकडे काही स्वायत्त संस्थांमधून या समारंभाला सोहळ्याचे स्वरुप आले आहे. ही संकल्पना बहुधा पाश्चात्त्य विद्यापीठांतून आपल्याकडे आली आहे.

विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील हा आनंदाचा क्षण आहे. कोणत्याही विद्यापीठाच्या प्रत्येक शैक्षणिक वर्षातील हा सर्वांत महत्त्वाचा समारंभ असतो.

विद्यापीठातील प्रशासकीय पातळीवर मात्र हा समारंभ विद्यापीठ कायद्यातील अधिनियम, परिनियम यांनी ठरवून दिलेला आणि कुलपती यांच्या तसेच अधिकार मंडळाच्या मान्यतेने रीतसर काटेकोरपणे पार पाडावयाचा समारंभ असतो. येथे शिष्टाचार हा शब्द महत्त्वाचा असतो.

काही दशकांपूर्वी हा समारंभ गांभीर्याने पार पाडला जातो, पण हळूहळू या समारंभाचे स्वरुप बदलत चालते आहे. या समारंभासाठी प्रत्येक विद्यार्थ्याला रीतसर, विहीत नमुन्यात शुल्कासह अर्ज करावा लागतो. काही वर्षांपूर्वी प्रत्यक्ष छापील अर्ज भरावा लागत असे. त्यानंतर ही सेवा काही बँकांकडे आउटसोअर्स करण्यात आली. आता हे कामकाज डिजिटलच्या युगात ऑनलाईन अर्ज व ऑनलाईन पेमेंट अशा टप्प्यावर सुरु आहे.

विद्यार्थ्यांना पूर्वी साध्या हस्तलिखित पेपरवर मोठ्या आकारात, सुंदर वळणदार अक्षरात मजकूर लिहिलेल्या पदव्या दिल्या जात होत्या. या पदव्या लिहिणारे सुंदर, रेखीव अक्षर असणारे कर्मचारी हे काम आवडीने करीत असत. सन १९९९-२००० नंतर किंवा २१ व्या शतकात कॉम्प्युटराईजड छापील [illegible] खास वैशिष्ट्ये विशेषत: कॉन्फीडन्शल फीचर निश्चित करण्यात आली आहेत. या पदवीची नक्कल करता येऊ नये म्हणून आता या पदवीला लॅमिनेशनही केले जाते. एका टप्प्यावर पदवी प्रमाणपत्रावर विद्यार्थ्यांचे फोटो आणि आईच्या नावाचा उल्लेख केला जाऊ लागला.

पदवी प्रमाणपत्र हे आवश्यक कागदपत्र असल्याने ते बिनचूक असावे, सुरक्षित असावे, ठराविक आकारात असावे अशा दृष्टीने सातत्याने बदल केले जात आहेत. शेवटचा टप्पा म्हणजे Demating of Degree. माझी कारकीर्द २०१४ रोजी संपेपर्यंत हा टप्पा पूर्ण करता आला नाही. तो सध्याचे अधिकारी करीत आहेत.

**डॉ. बी. एम. हिर्डेकर**
कुलसचिव, संजय घोडावत विद्यापीठ

पंतप्रधानांच्या डिजिटल इंडिया मोहिमेअंतर्गत आणि एमएचआरडीच्या सहयोगाने एनएसडीएल नॅशनल डिपॉझिटरीच्या माध्यमातून आला आणि या पदव्यांची हवी तेव्हा पडताळणी करता येणार आहे. यामुळे बोगस पदव्या या प्रकाराला आळा बसणार आहे. शिवाजी विद्यापीठाचा पदवीदान विभाग या पदव्या परीक्षा विभागामार्फत निर्दोष बनविण्याचे काम संगणक विभागाच्या सहकार्याने करतो. विशेष बाब म्हणजे या संपूर्ण प्रक्रिया योग्य त्या अधिकार मंडळाच्या संमतीनेच केल्या जातात.

दीक्षांत समारंभाचे पाहुण्यांचे भाषण हा या समारंभातील महत्त्वाचा भाग. हे भाषण बहुतांश वेळा अगोदरच पाहुणे पाठवून देतात. त्यांच्या प्रती स्नातकांना दिल्या जातात. मिरवणुकीत अधिकार मंडळाचे सदस्य शिष्टाचारानुसार सहभागी होत असतात. काही वर्षांपूर्वी या समारंभास शहरातील [illegible] व्यक्ती आवर्जून उपस्थित असत; पण अलीकडे हे प्रमाण कमी झाले आहे. पदवीदान समारंभ वर्षातून एकदाच होतो. (क्वचित प्रसंगी विशेष समारंभ घेता येतो.) त्यामुळे विद्यार्थ्यांना समारंभापर्यंत थांबावे लागते. दोन पदवीदान समारंभाच्या दरम्यान तत्काळ पदवी देण्याचा स्तुत्य निर्णय घेऊन ही अडचण विद्यापीठाने आता दूर केली आहे. पदव्या कधी द्याव्यात, कशा द्याव्यात, किती कालावधीत द्याव्यात याबाबतही काही मार्गदर्शक तत्त्वे आहेत. त्यामध्ये बदल आवश्यक आहे.

पदवीदान समारंभात विद्यार्थी हजर राहून पदवी घेणार की त्याला ती घरपोहोच हवी आहे, हे पर्याय अर्जात अगोदरच नमूद करावे लागतात. सध्या प्रत्यक्ष हजर राहून पदवी घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या थोडीशी कमीच आहे.

पीएच.डी. पदवी काही वर्षांपूर्वी सर्वांना व्यासपीठावर दिली जाई; पण पारितोषिके, पदव्यांची संख्या तसेच कालावधीचे बंधन लक्षात घेऊन या पदव्या देण्याची पद्धत नियंत्रित केली आहे. याचे भव्य, देखणे नियोजन, विद्यापीठांचा कार्यविस्तार, विद्यार्थ्यांची वाढती संख्या, भौगोलिक अंतर हे लक्षात घेऊन काही विद्यापीठांच्या पदव्या संलग्नित महाविद्यालयाकडे पाठविण्याची विकेंद्रीकरण नीती वापरत आहेत. काही विद्यापीठे जाहीर समारंभ न करता छोटेखानी स्वरुपात करतात. अलीकडे या महोत्सवासोबत ग्रंथमहोत्सव घेतला जातो. ग्रंथविक्री, ग्रंथप्रदर्शन, लेखक, साहित्यिक, वक्त्यांची भाषणे होतात. पदवीदान समारंभाचे नियोजन, पदवी छपाई, वितरण, जतन, गोपनीयता, पाहुण्यांचे नियोजन या सर्वच स्तरावर काही कालसुसंगत आणि विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी सुधारणा करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांचा या दिवशीचा उत्सवी मूड आणि विद्यापीठ परिसरात [illegible]

लोकमत

## संशोधन, परीक्षा, प्रशासनात 'बेस्ट'

शिवाजी विद्यापीठाचे आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन हे गरीब विद्यार्थ्यांना आर्थिक कारणामुळे शिक्षणापासून वंचित राहावे लागू नये म्हणून मदतीचा हात देते. त्यासह विद्यापीठाची गुणवत्ता शिष्यवृत्ती ही एक वैशिष्ट्यपूर्ण योजना आहे. विद्यापीठाने सुरुवातीपासून आपले प्रशासन कार्यक्षम ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. विद्यापीठाने लेखा विभागाचे संगणकीकरण केले आहे. विद्यापीठाची लेखा संहिता राज्य शासनाने स्वीकारली आहे, शिवाय राज्यातील सर्व विद्यापीठांना ती लागू केली आहे. राज्यातील अन्य विद्यापीठांच्या तुलनेत सर्वाधिक ११६८ परीक्षा घेऊनदेखील गेल्या दहा वर्षांपासून विद्यापीठाचे निकाल वेळेत जाहीर होत आहेत. परीक्षांचे निकाल वेळेत लावल्याबद्दल कुलपतींनी अनेकदा विद्यापीठाचे कौतुक केले आहे. गेल्या काही वर्षांपासून विद्यापीठाची 'जलयुक्त विद्यापीठ' योजनेमुळे राज्यभरात नवी ओळख निर्माण झाली आहे. विद्यापीठात पाण्याचा मोठा साठा करून विद्यापीठ पाण्याबाबत पूर्णत: स्वावलंबी होण्याच्या मार्गावर आहे. विद्यापीठ आपल्या परिसरातील सुंदर उद्यानासाठी प्रसिद्ध आहे. मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड संवर्धन केल्याने कोल्हापूरचे 'ऑक्सिजन हब' म्हणून ओळखले जात आहे. संशोधन, परीक्षा, प्रशासनासह विविध क्षेत्रांत विद्यापीठ 'बेस्ट' ठरले आहे.

## विद्यापीठाची कामगिरी दृष्टिक्षेपात

- सन २०१५-१६ मध्ये नॅशनल इन्स्टिट्यूशनल रँकिंग फ्रेमवर्कमध्ये देशात २८ वा आणि राज्यात प्रथम क्रमांक पटकाविला.
- देशातील 'बेस्ट ग्लोबल युनिव्हर्सिटीज्'च्या यादीत विद्यापीठ हे २१ व्या स्थानी राहिले.
- 'करन्ट सायन्स्'ने स्कोपस आकडेवारीच्या आधारावर केलेल्या सर्वेक्षणात संशोधन क्षेत्रात विद्यापीठ देशात १९ व्या क्रमांकावर होते.
- विद्यापीठाच्या बायो टेक्नॉलॉजी विभागाने देशातील टॉप टेन बीटी स्कूलमध्ये आठवा क्रमांक मिळविला.
- विद्यापीठाच्या ३४ एकर जागेत देशातील पहिले लीड बॉटॅनिकल गार्डन साकारले आहे. येथे देशातील सुमारे ११०० दुर्मीळ वनस्पतींचे जतन, संवर्धन केले जाते.
- विद्यापीठाचे देशातील पहिले वस्त्रोद्योग इनक्युबेशन सेंटर इचलकरंजीच्या डीकेटीई अभियांत्रिकी महाविद्यालयात कार्यान्वित आहे.
- केंद्र सरकारच्या 'ग्लोबल इनिशिएटिव्ह ऑफ अ‍ॅकेडेमिक नेटवर्क्स' (ग्यान) योजनेंतर्गत सलग सहा अभ्यासक्रम घेणारे विद्यापीठ हे देशातील एकमेव विद्यापीठ आहे.

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
उपकुलसचिव, शिवाजी विद्यापीठ

> विविध स्वरुपातील संधी उपलब्ध झाल्याने शिक्षणातील विद्यार्थिनींचा टक्का वाढला आहे. विद्यार्थिनी या शिक्षणाबाबत गांभीर्याने विचार करतात. परीक्षांची तयारी कष्टाने करून त्या उत्तीर्ण होतात. वर्षागणिक पदवीधर होणाऱ्यांमध्ये त्यांचे प्रमाण वाढत असून, महिला सक्षमीकरणाच्यादृष्टीने चांगले आहे.
>
> \- महेश काकडे, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

## विकासाचे पुढील टप्पे

| 24 | 30 | 55 |
|---|---|---|
| कला शाखेसाठी | वाणिज्यसाठी | विज्ञानसाठी |

**तर इतर दहा नवे अभ्यासक्रम सुरु केले जाणार आहेत.**

- प्रत्येक तालुका पातळीवर महिला महाविद्यालय
- चंदगड, शाहूवाडी, चांदोली धरण परिसर, जत, माणगाव, खरोशी (महाबळेश्वर) येथे सॅटेलाईट सेंटर साकारण्याचा प्रस्ताव
- कौशल्य आधारित व कम्युनिटी महाविद्यालय
- ऊर्दू माध्यमातून विज्ञान शाखेचे शिक्षण
- शुगर टेक्नॉलॉजी, योग शिक्षण, खादी उत्पादन व नक्षीकामाबाबतचा अभ्यासक्रम
- बी. ए. क्रिएटिव्ह रायटिंग, ब्रेल, कार्बन ट्रेडिंग, डिझायनिंग अ‍ॅण्ड गेमिंग अभ्यासक्रम



## नव्या अभ्यासक्रमांतून उच्च शिक्षणाची वाटचाल

बदलते तंत्रज्ञान, समाजातील गरज ओळखून अभ्यासक्रम सुरु करण्याच्या दिशेने उच्च शिक्षणामध्ये शिवाजी विद्यापीठाची वाटचाल सुरु आहे. राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवर ज्या अभ्यासक्रमांना मागणी आहे, त्याची सुरुवात विद्यापीठाने गेल्या दहा वर्षांमध्ये केली आहे. त्यामध्ये बायोटेक्नॉलॉजी, फूड सायन्स अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी, नॅनो सायन्स अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी, आदींचा समावेश आहे. उपयोजित अभ्यासक्रमांची सुरुवात करुन त्यांना पायाभूत अभ्यासक्रमांची जोड दिली आहे. त्यात एम. टेक. इन रुरल टेक्नॉलॉजी, मास्टर ऑफ रुरल स्टडी, मायक्रो बायोलॉजी, पर्यावरणशास्त्र यांचा समावेश आहे. गेल्या पाच वर्षांत विद्यापीठात एम. ए. वूमेन्स स्टडीज, एम. ए. हिंदी प्रौद्योगिकी, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट (एमएसडब्ल्यू., एमआरएस, एमसीए, एमबीए, एम. टेक. रुरल), एम.एस्सी. अ‍ॅप्लाईड स्टॅटॅस्टिक्स, एम. एस्सी. फार्मास्युटिकल मायक्रो बायॉलॉजी, एम. एस्सी. इन्व्हरमेंट बायो टेक्नॉलॉजी, बी.एस्सी., एम. एस्सी., नॅनो सायन्स अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी हे अभ्यासक्रम सुरु केले आहेत. त्यासह शेतकऱ्यांसाठी रेशीम शेतीसाठीचा डिप्लोमा इन सेरिक्लचर अभ्यासक्रम यावर्षीपासून प्राणिशास्त्र विभागात सुरु केला आहे. यात आठवी उत्तीर्ण आणि तीन रेशीम शेतीचा अनुभव असणे आवश्यक आहे. 'एम. एस्सी.'च्या विद्यार्थ्यांसाठी पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन सेरिक्लचर अभ्यासक्रम सुरु केला.

लोकमत

# २ लाख ४६ हजार पदवीधर पाच वर्षांत

**1** ग्रामीण विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणाऱ्या शिवाजी विद्यापीठाने स्थापनेची ५५ वर्षे पूर्ण केली आहेत. या वाटचालीत वर्षागणिक पदवीधर होण्यात विद्यार्थिनी आघाडी घेत आहेत. विज्ञानापासून विविध पदविका अभ्यासक्रमांपर्यंत व पदवीधर होण्यात विद्यार्थ्यांच्या तुलनेत विद्यार्थिनी पुढे आहेत. यावर्षी विद्यापीठाचा ५४ वा दीक्षांत समारंभ होणार आहे. एकूण ५० हजार ४४४ स्नातकांना पदवी प्रदान केली जाणार आहे. यात विद्यार्थिनींची संख्या २६ हजार ९३८ इतकी आहे.

**2** कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यांतील दुर्गम, दुष्काळी आणि डोंगरी भागांपर्यंत विद्यापीठ पोहोचले आहे. संलग्नित ३४ महाविद्यालयांतील १४ हजार विद्यार्थ्यांपासून सुरु झालेल्या विद्यापीठात सध्या दोन लाख ४२ हजार ८९७ विद्यार्थी-विद्यार्थिनी शिक्षण घेत आहेत. यात एक लाख १७ हजार ६६६ इतक्या विद्यार्थिनी आहेत. गेल्या पाच वर्षांत दोन लाख ४६ हजार ३३२ विद्यार्थी-विद्यार्थिनींना विद्यापीठाने पदवी प्रदान केल्या आहेत. यामध्ये विज्ञान, वाणिज्य, संगणकशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, विधी (लॉ), शिक्षणशास्त्र आणि प्रमाणपत्र व पदविका अभ्यासक्रमांमध्ये विद्यार्थिनी आघाडीवर आहेत. कला व सामाजिकशास्त्रे आणि फाईन आर्टस्, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, व्यवस्थापन (मॅनेजमेंट) या विद्या शाखांमध्ये त्या विद्यार्थ्यांच्या तुलनेत मागे आहेत. पाच वर्षांत एक लाख ३१ हजार ९७ विद्यार्थिनी पदवीधर झाल्या आहेत.

## पाच वर्षांतील पदवीधर विद्यार्थ्यांची आकडेवारी

| सन | विद्यार्थी | विद्यार्थिनी | एकूण |
|---|---|---|---|
| २०१३-१४ | २४३०२ | २१८१७ | ४६११९ |
| २०१४-१५ | २०६६७ | २६८२४ | ४७४९१ |
| २०१५-१६ | २४३६६ | २७९०३ | ५२२६९ |
| २०१६-१७ | २२३८४ | २७६१५ | ४९९९९ |
| २०१७-१८ | २३५०६ | २६९३८ | ५०४४४ |



लोकमत

**1995** मध्ये स्थापन झालेले हे अध्यासन अर्थशास्त्र विभागाचे बँक ऑफ इंडिया चेअर इन रुरल डेव्हलपमेंट आहे.

**2003** मध्ये मान्यता मिळालेल्या भगवान महावीर अध्यासनाचे इतिहास विभागामार्फत प्रा. व्ही. बी. ककडे यांच्या समन्वयाखाली काम सुरु आहे.

**54** लाख देणगी या अध्यासनाला मिळाली आहे.

# वेगवेगळ्या दहा अध्यासनांमधून होते चिकित्सा

शिवाजी विद्यापीठाच्या विविध अध्यासन केंद्रांच्या माध्यमातून ज्ञानमीमांसा होत असते. त्या त्या अध्यासनांच्या माध्यमातून संबंधित विषयाचे चिकित्सक मूल्यांकन तथा समकालीन चर्चा यावर सातत्याने परिसंवाद, परिषद, व्याख्यानमालांचे आयोजन केले जाते.

विविधांगी संशोधन, लेखन, चिंतन यामधून संबंधित अध्यासनाद्वारे त्या त्या विषयाचे महत्त्व मांडण्यात येते. मुळात संबंधित विषयाची चिकित्सा व्हावी, हा अध्यासन केंद्रांचा मुख्य हेतू असतो.

समकालीन वास्तवात अत्यावश्यक आणि आत्यंतिक महत्त्वाची अशी अनेक क्षेत्रे संशोधन व चिकित्सेसाठी उपलब्ध असतात. त्यातून विविध अध्यासन केंद्रांच्या माध्यमातून नवनव्या माहितीचे सृजन उपलब्ध होत असते. वेगवेगळ्या दहा अध्यासनांच्या माध्यमातून काम सुरू आहे. अर्थशास्त्र विभागाचे बँक ऑफ इंडिया चेअर इन रुरल डेव्हलपमेंट हे १९९५ मध्ये स्थापन झालेले अध्यासन. २१ जानेवारी १९९५ च्या व्यवस्थापन परिषदेच्या ठरावानुसार या अध्यासनाला मान्यता मिळाली. ५० लाख रुपयांचा निधी बँक ऑफ इंडियाकडून प्राप्त झालेला होता. प्रा. व्ही. बी. ककडे हे अध्यासनाचे सध्या समन्वयक आहेत. १४

**संदीप आडनाईक**

नोव्हेंबर २००३ मध्ये मान्यता मिळालेल्या भगवान महावीर अध्यासनाचे इतिहास विभागामार्फत प्रा. व्ही. बी. ककडे यांच्या समन्वयाखाली काम सुरु आहे. शासनाकडून २५ लाख आणि नंतर ५४ लाख देणगी म्हणून या अध्यासनाला रक्कम मिळाली आहे. आयडीबीआयचे कै. आर. एन. गोडबोले अध्यासन वाणिज्य विभागामार्फत २४ मे २००० रोजी झालेल्या सामंजस्य करारानुसार सुरु आहे. प्रा. एस. एस. महाजन हे या अध्यासनाचे समन्वयक असून देणगी स्वरुपात या अध्यासनाला ५० लाख रुपये मिळाले आहेत. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासन मराठी विभागामार्फत २७ एप्रिल २००६ पासून सुरु आहे. डॉ. आर. एस. शिंदे हे या अध्यासनाचे समन्वयक आहेत. प्रा. एन. डी. पाटील यांच्याकडून या अध्यासनाला दहा लाख रुपये मिळाले आहेत. संत तुकाराम अध्यासन मराठी विभागामार्फत १९९६ पासून सुरु आहे. डॉ. एन. व्ही. मोरे हे याचे समन्वयक असून, तनपुरी महाराज यांच्याकडून देणगी स्वरुपात ५० हजार रुपये मिळालेले आहेत. इतिहास आणि राज्यशास्त्र विभागामार्फत लोकनेते बाळासाहेब देसाई अध्यासन शासनाच्या १७ जानेवारी २०१३ च्या पत्रानुसार सुरु झाले. शासनाकडून या अध्यासनाला निधी मिळाला असून, प्रा. ए. आर. पाटील आणि डॉ. पी. आर. पवार हे समन्वयक आहेत. कै. यशवंतराव चव्हाण अध्यासन हे राज्यशास्त्र विभागामार्फत २३ एप्रिल २०१३ पासून सुरु असून डॉ. भारती पाटील या अध्यासनाच्या समन्वयक असून खासदार सुप्रिया सुळे यांच्याकडून देणगी स्वरुपात ५० लाख रुपये प्राप्त झाले आहेत. कै. ग. गो. जाधव अध्यासन हे वृत्तपत्र व संवादशास्त्र विभागामार्फत चालविले जात असून, त्याला २०१४ मध्ये मान्यता मिळाली. २०१६ पासून हे अध्यासन सुरु असून ५० लाखांचा निधी मिळाला आहे. डॉ. एन. एच. पवार या अध्यासनाच्या समन्वयक आहेत. कै. दत्ता देशमुख अध्यासन राज्यशास्त्र विभागामार्फत २६ ऑक्टोबर २०१६ पासून सुरु असून, सुरेश परचुरे, कामगार संघटनेमार्फत यासाठी १० लाख रुपयांचा निधी मिळाला आहे. डॉ. भारती पाटील या अध्यासनाच्या समन्वयक आहेत.

लोकमत

## संलग्नित महाविद्यालये

| | | | |
|---|---|---|---|
| 147 कला, विज्ञान आणि वाणिज्य | 07 विधी (लॉ) | 42 अभियांत्रिकी | 1 नॉन-कन्व्हें शियल |
| 02 इंटेरिअर डिझायनिंग | 39 शिक्षणशास्त्र | 17 व्यवस्थापन | 1 ललित कला नाट्यतंत्र |
| 04 बीबीए., बीसीए., एमसीए | 01 बीएसडब्ल्यू., एमएसडब्ल्यू | 17 औषध निर्माण शास्त्र | 4 शारीरिक शिक्षण |

### जिल्हानिहाय महाविद्यालय, विद्यार्थ्यांची संख्या

| जिल्हा | महाविद्यालय | एकूण विद्यार्थी |
|---|---|---|
| कोल्हापूर | ११४ | १ लाख २ हजार २२ |
| सांगली | ८६ | ६२ हजार ६९८ |
| सातारा | ४३ | ६४ हजार ७०३ |

### विद्यार्थी-विद्यार्थिनी

२ लाख ४२ हजार ८९७
एकूण संख्या

१ लाख १७ हजार ६६६
विद्यार्थिनींची संख्या

१ लाख २५ हजार २३१
विद्यार्थ्यांची संख्या

२६ हजार ७१५
दूरशिक्षण केंद्रातील विद्यार्थी-विद्यार्थिनींची संख्या

### सहा वर्षांतील संख्या

| वर्ष | विद्यार्थी | विद्यार्थिनी | एकूण (लाखांत) |
|---|---|---|---|
| २०११-१२ | १०९९३३ | १००५१९ | २१०४५२ |
| २०१२-१३ | १३२७११ | ११९७४३ | २५२४५४ |
| २०१३-१४ | १३६२५१ | १२६१४३ | २६२३९४ |
| २०१४-१५ | १४९२३९ | ११४५६६ | २६३८०५ |
| २०१५-१६ | १३७४९३ | १३२८३५ | २७०३२८ |
| २०१६-१७ | १३६६७३ | १३२९३९ | २६९६१२ |

## विद्यापीठ कॅम्पसमधील विद्यार्थी

| | | |
|---|---|---|
| 707 पीएच.डी | 177 एम. फिल. | 3776 पदव्युत्तर |
| 1772 पदवीधर | 482 पी. जी. डिप्लोमा | 166 पदविका |

562
प्रमाणपत्र



लोकमत

# प्राध्यापक होण्याचे ध्येय

शिक्षणातून तरुणाईला वेगळी दिशा देण्यासाठी मला प्राध्यापक व्हावयाचे आहे. ते माझे ध्येय आहे, असे विद्यापीठाच्या राष्ट्रपती पदकाची मानकरी ठरलेल्या प्रियांका पाटील हिने सांगितले. प्रियांका म्हणाली, माझे शालेय शिक्षण शिरोली दुमाला (ता. करवीर) येथे झाले. महाविद्यालयीन शिक्षण महावीर महाविद्यालयातून पूर्ण केले.



बी.ए.बी.एड्. अभ्यासक्रमाच्या द्वितीय वर्षात असताना माझा विवाह शिरोली पुलाची (ता. हातकणंगले) येथील सुजित पाटील यांच्याशी झाला. महाविद्यालयीन शिक्षण घेताना माझा विविध उपक्रमांत सहभाग असायचा. विवाहानंतर या सहभागाची गती वाढली. एनसीसीमध्ये देखील सक्रियपणे सहभागी झाले. महावीर महाविद्यालयातील तेजस्विनी युवा मंच, शिवप्रेमी सखी मंचच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविले. महाविद्यालयातील 'देशभूषण' नियतकालिकाची विद्यार्थी संपादक म्हणून काम पाहिले. मला आतापर्यंत 'देशभूषण आदर्श विद्यार्थी पुरस्कार', 'गुणवंत पुरस्कार' आणि राज्य शासनाचा 'युवा पुरस्कार' मिळाला आहे. विद्यापीठाचे राष्ट्रपती पदक जाहीर झाल्याने माझ्या आजपर्यंतच्या कष्टाचे चीज झाले आहे. या यशात माझ्या माहेरी आणि सासरच्या कुटुंबीयांचा मोठा वाटा आहे. सध्या विद्यापीठातील इतिहास विभागाच्या एम.ए.

Hello Kolhapur
Page No. 8 Mar 15, 2018
Powered by: erelego.com

लोकमत

# स्पर्धा परीक्षेत करिअर करणार



संस्कृत विषय अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी 'संस्कृत'चे वर्ग सुरु करणार आहे. त्यासह मला स्पर्धा परीक्षेत करिअर करायचे आहे, असे विद्यापीठाच्या कुलपती पदक पटकविणाऱ्या दीक्षा मोरे हिने सांगितले. दीक्षा म्हणाली, वाई (जि. सातारा) येथील गंगापुरीमध्ये माझे घर आहे. वाईतील नवीन मराठी शाळा आणि कन्याशाळेत माझे शालेय शिक्षण झाले. साताऱ्यातील छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये एम. ए. (संस्कृत) अभ्यासक्रमाचे शिक्षण घेताना इयत्ता आठवी ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना मी संस्कृत विषय शिकवत होते. विद्यार्थ्यांमध्ये संस्कृत विषयाची गोडी निर्माण झालेली पाहून विशेष आनंद होत असे. संस्कृत विषयात सर्वाधिक गुण मिळविण्यासाठी माझ्या महाविद्यालयातील ग्रंथालयाच्या पुस्तकांची मोठी मदत झाली. कुलपती पदक मिळाल्याचा खूप आनंद होत आहे. या यशासाठी मला आई-वडील, शिक्षकांचे महत्त्वपूर्ण मार्गदर्शन लाभले. संस्कृत विषयात मला पीएच.डी. करायची आहे. या विषयातील प्राध्यापक म्हणून काम करण्याची देखील इच्छा आहे. सध्या नेट-सेट परीक्षेची मी तयारी करीत आहे.

15 MAR 2018 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांनी बौध्दिक मालमत्ता अधिकाराचे धडे घ्यावेत

प्रतिनिधी
कोल्हापूर

निरनिराळ्या क्षेत्रात शोधनिबंध आणि संशोधनात शिवाजी विद्यापीठ देशात पाचव्या स्थानांवर आहे. अधिक बौद्धिकसंपन्नता मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांनी बौद्धिक मालमत्ता अधिकाराचे धडे घेणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन प्रकुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील बौद्धिक संपत्ती हक्क कक्षाच्या वतीने आयोजित कार्यशाळेच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. राजर्षी शाहू सभागृहातील आयोजित कार्यशाळेत 'विज्ञान दिन आणि जागतिक बौद्धिक हक्क' या विषयावर मान्यवरांनी मार्गदर्शन केले.

**प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे प्रतिपादन**

प्र-कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, समाजातील प्रत्येक घटकात आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक फायदे घडवून सार्वजनिक जागरूकता निर्माण करण्याचे कार्य बौद्धिक मालमत्ता अधिकार करतो. तसेच शिक्षण, प्रशिक्षण, कौशल्य बांधणी, मानवी संसाधने, संस्था मजबूत आणि विस्तारित करण्याचे काम करंते. बौद्धिक मालमत्ता अधिकार म्हणजे व्यापार निर्मितीमध्ये प्रदान करणारी हि संज्ञा आहे. ट्रेडमार्क, कॉपीराइट्स, पेटेंट, औद्योगिक डिझाईन, अधिकार आणि गोपनीय माहिती या अधिकारांतर्गत चालतात. याचा विद्यार्थ्यांनी सखोल अभ्यास केला तर उदयोगशील विचारांना प्रेरणा मिळेल.

बौद्धिक मालमत्ता अधिकार तज्ञ अनिल कुलकर्णी आणि प्रवीण पंडीत यांनी दिवसभर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. डॉ. अनिल घुले यांनी प्रास्ताविक केले. यावेळी डॉ. जयदीप बागी, अजित चौगुले यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते

15 MAR 2018
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मुलाखत तंत्र आत्मसात करा : डॉ. मोरे

कोल्हापूर, ता. १४ : 'मुलाखत तंत्र आत्मसात करताना पूर्वतयारी, सकारात्मक दृष्टिकोन ठेवल्यास यश निश्चित मिळेल,' असे मत विद्यापीठाचे शैक्षणिक सल्लागार प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्रातर्फे राजर्षी शाहू सिनेट सभागृह येथे आयोजित मुलाखत तंत्र कार्यशाळेत ते बोलत होते. केंद्राचे संचालक प्रा. डॉ. एम. ए. अनुसे अध्यक्षस्थानी होते.

डॉ. मोरे म्हणाले, "मुलाखतीला जाताना आकर्षक बायोडेटा, विषयातील ज्ञानामध्ये विशेष प्रावीण्य असणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी महत्त्वाच्या मुद्द्यावर आधारित तयारी केली पाहिजे. मुलाखत तंत्र आत्मसात करणारा विद्यार्थीच आयुष्यात यशाला गवसणी घालू शकेल. उत्कृष्ट सादरीकरण करण्याचे तंत्र म्हणजे मुलाखत तंत्र होय."

डॉ. अनुसे म्हणाले, की मुलाखतीचे तीन टप्पे असतात. त्यांमध्ये बायोडेटा, गटचर्चा आणि मुलाखत तंत्र यांचा समावेश होतो. यांची योग्य सांगड घातल्यास मुलाखत यशस्वीरीत्या देता येते. उपकुलसचिव कॅप्टन डॉ. नितीन सोनजे यांनी प्रास्ताविक व स्वागत केले. डॉ. के. बी. पाटील यांनी परिचय करून दिला. क्रांती कांबळे व सारिका ववेर यांनी सूत्रसंचालन केले. उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, उपकुलसचिव एस. एम. कुबल, डॉ. सोनजे, सहायक कुलसचिव कॅप्टन ए. जे. काटकर यांनी मागदर्शन केले. समन्वयक डॉ. नितीन रणदिवे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 MAR 2018
Times of India

# Over 50k to get degrees at SUK convocation

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) will hold its 54th convocation ceremony on March 19 where as many as 50,444 students — on and off campus — will receive their degrees.

Eminent scientist and former ISRO chairman A S Kiran Kumar will be the chief guest at the event. "We will be giving out 279 PhD degrees and 170 prizes to 107 students from various streams. In addition, 24,245 students will receive their degrees on the day, while the rest will be sent by post," an official from Shivaji University said.

Though the degree distribution programme will begin at 7 am on March 19, the event of declaration of degrees and distribution of prizes will take place in the evening on the same day. A cultural programme along with book exhibition programme will also be organised. While the cultural programme will take place on March 20, the book exhibition will start from March 19 and continue till March 20. A total of 50 stalls of different publishing agencies, book sellers, digital book sellers and database packages will be there during programme that will remain open from 9am to 9pm. "The preparations for the convocation ceremony are going on with every department assigned a particular task," an official said. TNN

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

15 MAR 2018

पुढारी

# शिवाजी विद्यापीठ सुरू करणार वेब रेडिओ

## ■ व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत मान्यता

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने वेब रेडिओ सुरू करणे व संबंधित मार्गदर्शक सूचना निश्चित करण्यास मान्यता देण्याचा निर्णय व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत घेण्यात आला. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी तर सचिवपदी डॉ. व्ही. डी. नांदवडेकर होते.

या बैठकीत शिवाजी विद्यापीठात वृक्ष लागवडीकरिता जागा उपलब्ध करून देण्याच्या सामाजिक वनीकरणाच्या मागणीस मंजुरी देण्यात आली.

तसेच दीक्षांत समारंभात पदवी, पदविका, प्रमाणपत्रे अभ्यासक्रमांची प्रमाणपत्रे प्रदान करण्याच्या प्रस्तावासही मान्यता देण्यात आली. बैठकीस प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्यासहीत सदस्य उपस्थित होते.

15 MAR 2018
सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विकसित प्रदेशांत शेतकरी आत्महत्या चिंतेची बाब


## डॉ. सांगवान : शिवाजी विद्यापीठात गोडबोले अध्यासनातर्फे व्याख्यान

कोल्हापूर, ता. १४ : 'कृषी पतपुरवठा मोठ्या प्रमाणात होताना आणि काही राज्यांत कर्जमाफीही दिलेली असताना विकसित प्रदेशांतही शेतकरी आत्महत्यांमध्ये वाढ होणे, ही चिंतेची बाब आहे,' असे प्रतिपादन चंदीगडच्या स्टेट बँक ऑफ इंडिया अध्यासनाचे प्रा. डॉ. एस. एस. सांगवान यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या दि युनायटेड वेस्टर्न बँकेच्या कै. आर. एन. गोडबोले अध्यासनातर्फे 'ग्रामीण पतपुरवठ्याचा बदलता दृष्टिकोन आणि ग्रामीण गरिबांचे वित्तीय समावेशन' या विषयावर आर. एन. गोडबोले स्मृती व्याख्यान देताना ते बोलत होते. वाणिज्य विभागप्रमुख प्रा. डॉ. ए. एम. गुरव अध्यक्षस्थानी होते.

डॉ. सांगवान म्हणाले, "बँकांनी दिलेल्या कर्जासाठी शेतकरी आत्महत्या करत आहेत, यात आपले काय चुकले हे शोधले पाहिजे. गुंतवणूक पतपुरवठ्याचे प्रमाण कमी होत आहे आणि उत्पादन पतपुरवठ्याचे प्रमाण वाढत आहे. काही राज्यांत कर्जमाफी देऊनही परिस्थिती सुधारली नाही. ज्यांचा बँकेशी संबंध नव्हता त्याची मोठ्या प्रमाणात बँक खाती उघडली गेली आहेत, पण त्यांच्या पतपुरवठ्याच्या गरजा बँक पूर्ण करू शकत नाहीत, त्याकडे लक्ष द्यावे लागेल. १९७५ मध्ये विभागीय ग्रामीण बँकांची सुरवात झाली."

वाढत्या पतपुरवठ्यामुळे राजकीयदृष्ट्या दिल्या गेलेल्या कर्जमाफीच्या योजना, यामुळे शेती व ग्रामीण क्षेत्रातील पत व्यवस्थेत वातावरण गढूळ बनले व परतफेडीवर परिणाम होऊ लागला. अशीच परिस्थिती राहिल्यास भविष्यात पतपुरवठा करताना बँका हात आखडता घेतील व त्यामुळे ग्रामीण विकासाला खीळ बसेल, अशी भीती त्यांनी व्यक्त केली.

अध्यक्षस्थानावरून बोलताना प्रा.(डॉ.) ए. एम. गुरव यांनी ग्रामीण भागात शेतीक्षेत्रात अधिक गुंतवणूक होण्याची अपेक्षा व्यक्त केली. अध्यासनप्रमुख प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन यांनी प्रास्ताविक व स्वागत केले. डॉ. के. व्ही. मारुलकर यांनी आभारप्रदर्शन व सूत्रसंचालन केले. या वेळी डॉ. जे. एफ. पाटील, डॉ. व्ही. एस. पाटील, डॉ. श्यामसुंदर मिरजकर, डॉ. सागर वाळवेकर, डॉ. अनिकेत जाधव, डॉ. अमर जाधव, डॉ. एस. डी. कोरे, श्री. बी. टी. नाईक. डॉ. गिरीगोसावी हे उपस्थित होते.



**कोल्हापूर : आर. एन. गोडबोले व्याख्यानमालेत बोलताना डॉ. एस. एस. सांगवान.**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 MAR 2018
पुण्यनगरी

# सुवर्णपदक आजपर्यंत केलेल्या कष्टाचे फळ

## - प्रियांका पाटील

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** शिवाजी विद्यापीठाकडून देण्यात येणारे राष्ट्रपती सुवर्णपदक हे आजपर्यंत आपण केलेल्या कष्टाचे फळ आहे. विद्यापीठाची ही कौतुकाची थाप भावी वाटचालीस प्रेरणादायी राहील. भविष्यामध्ये प्राध्यापिका होऊन तरुणांना चांगली दिशा देण्याचे काम करण्याची इच्छा आहे, अशी प्रतिक्रिया राष्ट्रपती सुवर्णपदक विजेती प्रियांका पाटील हिने दिली.


प्रियांका पाटील

शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागातील विद्यार्थिनी प्रियांका राजाराम पाटील हिची शिवाजी विद्यापीठाकडून देण्यात येणाऱ्या यंदाच्या राष्ट्रपती सुवर्णपदकासाठी निवड झाली आहे. १९ मार्च रोजी शिवाजी विद्यापीठाच्या ५४ व्या दीक्षांत समारंभात प्रियांका पाटील हिला राष्ट्रपती सुवर्णपदकाने सन्मानित करण्यात येणार आहे. शिवाजी विद्यापीठाकडून देण्यात येणाऱ्या सर्वोच्च अशा राष्ट्रपती सुवर्णपदकासाठी आपली निवड झाली, याचा आपल्याला खूप अभिमान वाटत असून खूप आनंद होतो आहे. राष्ट्रपती पदकामुळे आपली जबाबदारी वाढली असून, यापुढेही उत्कृष्ट कामगिरी करून यशाच्या पायऱ्या सर करायच्या आहेत. विद्यापीठाची ही कौतुकाची थाप भावी वाटचालीस आपल्याला प्रेरणादायी राहील, अशी प्रतिक्रिया राष्ट्रपती सुवर्णपदक विजेती प्रियांका पाटील हिने दिली.

## दीक्षा मोरे यांना कुलपती पदक



शिवाजी विद्यापीठामध्ये एम.ए. अभ्यासक्रमांतर्गत संस्कृत विषयामध्ये सर्वाधिक गुण मिळवल्याबद्दल साताऱ्याच्या छत्रपती शिवाजी कॉलेजच्या दीक्षा मोरे यांना कुलपती पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. दीक्षांत समारंभादरम्यान मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार मोरे यांना बहाल करण्यात येणार आहे.

15 MAR 2018

तरुण भारत

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मृत्युंजय संशोधक, शास्त्रज्ञ




**डॉ. व्ही. एन. शिंदे**
(विज्ञान लेखक आणि उपकुलसचिव शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.)

वैज्ञानिक घडामोडीशी काहीही देणे घेणे नसलेल्या सर्वसामान्यापर्यंत पोहोचलेला, अनेक शारीरीक मर्यादाना बलस्थान बनवणारा, पीएच.डी. विद्यार्थ्याच्या प्रत्येक प्रबंधातून एक स्वतंत्र सिद्धांत मांडणारा, अनंताची मर्यादा असणाऱ्या अवकाशचा वेध घेणारा ज्ञानरूपी प्रकाशाने तळपणारा संशोधक म्हणजेच स्टिफन हॉकिंग! ज्याने मृत्यूला परतवले. सर्व संकटावर मात करत संशोधन केले आणि ते लोकापर्यंत पोहोचवले, अशा असामान्य वैज्ञानिकाच्या जाण्याने केवळ वैज्ञानिक क्षेत्राचीच नव्हे तर संपूर्ण समाजाची मोठी हानी झाली आहे.

त्यांच्या घरातील प्रत्येकजण अभ्यास करत असायचा. अगदी जेवतानाही गप्पा न मारता प्रत्येकजण पुस्तक वाचत असे. स्टिफन यांना संशोधनाचे बाळकडू घरातून मिळाले. त्यांच्या हुशारीमुळे त्याना शालेय जीवनात त्यांचे मित्र आईनस्टाईन म्हणत. वडिलांच्या शिक्षणाबाबत तिव्र भावना होत्या. आपल्या मुलाला वेबमिनिस्टर स्कुल या प्रतिष्ठित या शाळेत पाठवायचे होते, मात्र या शाळेच्या प्रवेश परीक्षेवेळी स्टिफन आजारी पडले आणि त्यांची संधी गेली. इतर मुलाप्रमाणे अभ्यास, खेळ या सर्वांचा आनंद घेत शालेय शिक्षण संपवले आणि महाविद्यालयीन जीवन सुरू झाले.

त्यानी १९५९ मध्ये ऑक्सफर्ड विद्यापीठाची बी.ए. ही पदवी निसर्ग विज्ञानातून संपादन केली. त्याना परीक्षेतील यशामुळे पुढील शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मिळाली. ते वीस वर्षांचे असताना अचानक आजारी पडले. आणि त्यातून ते कधीचं बरे झाले नाहीत. आई आणि वडील दोघेही वैद्यकिय क्षेत्रातील उच्चपदस्थ असल्याने सर्वोत्तम उपाय होत होते. मात्र हे उपचार कामी येत नव्हते. सर्व चाचण्या झाल्या आणि त्यांच्या २१ व्या वाढदिवशी ८ जानेवारी, १९६३ ला त्यांना मोटर न्युरॉन डिसीजहा असाध्य आजार झाल्याचे समजले. संपुर्ण कुटुंबाला हा मोठा हादरा होता कारण या रोगात हळूहळू स्नायूवरील नियंत्रण हरवत जाते. अशक्तपणा येतो. सर्व हालचाली कमी होत जातात. आणि अल्पावधीत आजारी व्यक्ती मृत्यू पावते. सर्व चाचण्याअंती स्टिफन दोन वर्ष जगतील असे डॉक्टरनी जाहिर केले. अश्रू गाळत कांही दिवस ते राहिले मात्र दोन वर्षे आहेत ती तरी मजेत जगू या असा निर्धार केला .त्यानी डॉक्टरेटसाठी प्रवेश घेतला आणि त्यानी वैश्विक किरणावर अभ्यास करायला सुरूवात केली. १९६६ मध्ये त्यानी डॉक्टरेट संपादन केली. त्यांच्या प्रबंधासाठी



त्याना ?डम्स पारितोषिक देण्यात आले. आजाराने आपले काम सुरू ठेवले. हळूळळू त्यांचे अवयव निकामी होवू लागले. अशक्तपणा वाढू लागला. त्याना पुन्हा दवाखान्यात भरती केले. आता आपले कांही खरे नाही या भावनेने त्याना गाठले. मात्र त्या दवाखान्यात त्यांच्यापेक्षा जास्त वेदनादायक अवस्थेत रूग्ण होते. त्यांना पाहून आपला त्रास काहीच नसल्याचे त्याना जाणवले आणि त्यानी परिस्थितीचा सामना करण्याचा निर्धार केला. मग जे पदरी पडेल ते पावन करून घेत, कुटुंबाचा परंपरागत अभ्यासाचा रस्ता क्रमायला सुरूवात केली. पुढे १९८५ मध्ये न्यूमोनिआ झाला. आजार खुप वाढला होता. तातडीने शस्त्रक्रिया करणे आवश्यक होते. शस्त्रक्रिया करताना त्यांचा कंठ निकामी होणार होता. संवादासाठी असणारा अवयवही निकामी होत होता. त्यांनी तो धक्काही सहन केला. शस्त्रक्रिया झाली आणि त्यांचा आवाज गेला. तोपर्यंत या वैज्ञानिकाच्या कार्याचे महत्त्व जगाला समजले होते. संगणक तज्ज्ञ डेव्हिड मेसन यांनी हॉकिंग यांच्या संगणकासाठी अशी आज्ञावली बनवली की त्या संगणकाच्या माध्यमातून हॉकिंग बोलू लागले. भाषणे देऊ लागले. अनेक देश परदेशात फिरत त्यांनी व्याख्याने दिली.

दरम्यान त्यांचे दोन विवाह झाले. पहिली पत्नी जेनपासून त्यांना तीन मुले झाली. पंचेविस वर्षाच्या संसारातून त्यानी वेगळे होण्याचा निर्णय घेतला. पुढे त्यांनी त्यांची देखभाल करणारी नर्स एलियन मेसन यांच्यासोबत विवाह केला. तो अकरा वर्ष टिकला आणि ते वेगळे झाले. त्यांच्या जीवनावर १९९९ मध्ये आलेल्या एका ?निमेशन पटाने स्टिफन यांचे नाव घराघरात पोहोचले. नंतर आलेल्या स्टिफन हॉकिंग्ज युनिव्हर्समुळे ते आणखी लोकप्रिय झाले.

अशा अवस्थेत त्यांनी भौतिकशास्त्र आणि रसायनशास्त्राचा अभ्यास केला. त्यांनी आईनस्टाईनच्या सापेक्षतावादाच्या सिद्धांताचा अभ्यास केला आणि कृष्ण विवरावर आपले संशोधन सुरू ठेवले. त्यातून त्यानी कृष्ण विवरातून कण बाहेर पडत असल्याचे सिद्ध करता आले. वैज्ञानिक जगताने त्यांचे हे संशोधन सुरूवातीला पुर्णत: नाकरले. मात्र हळहळू प्रयोतून स्टिफन यांचे म्हणणे सिद्ध होवू लागले. पुढे हा सिद्धांत सर्वमान्य झाला. विवरातून बाहेर पडणाऱ्या कणांच्या सिद्धांताला हॉकिंग रॅडिएशन थिअरी म्हणून ओळखले जावू लागले. गणित आणि भौतिकशास्त्रातील अनेक अनुत्तरीत प्रश्नांची उत्तरे ते शोधत राहिले. त्यांचे हॉकिंग रॅडिएशन सोबत पेन्रोज हॉकिंग थिअरम्स, बेकेनस्टेन हॉकिंग फॉर्मूला, हॉकिंग एनर्जी, गिबन्स–हॉकिंग्ज अन्सॅट्झ, गिबन्स– हॉकिंग्ज इफेक्ट, गिबन्स–हॉकिंग्ज स्पेस, गिबन्स–हॉकिंग्ज बाउंडरी टर्म, थ्रोन– हॉकिंग्ज–प्रिस्किल बेट हे महत्त्वाचे शोध आहेत.

भौतिकशास्त्र, गणितातील अकरा मूलभूत सिद्धांत त्यांनी मांडले. हे सर्व संशोधन अवकाशाशी निगडीत आहे. त्यांच्या या कार्यासाठी त्यांना इंग्टन मेडल, अईनमन प्राईज, ह्युजेस मेडल, अल्बर्ट आईनस्टाईन ?वार्ड, आरएएस सुवर्ण पदक, डिरॅक पदक, वोल्फ प्राईज, प्रिंस ऑफ ऑस्ट्रिया ?वार्ड, अँड्रू गिमंट पारितोषिक, नायलर प्राइज आणि लेक्चररशिप, लिलेनफिल्ड ?वार्ड, अल्बर्ट मेडल, कोपले प्राईज, प्रसिडेंशिअल मेडल फॉर फ्रिडम, फंडामेंटल फिजिक्स प्राईज असें नोबेल वगळता अन्य विज्ञानक्षेत्रातील सर्व पुरस्कार देण्यात आले आहेत. त्यांना रॉयल सोसायटीने आपल्या सन्मानीय सदस्यत्व प्रदान केले होते. त्यांच्या विश्वाच्यां प्रसरणाचा सिद्धांत हा खूपच प्रसिद्ध झाला. त्यांनी अकरा विद्यार्थ्यांना डॉक्टरेटसाठी मार्गदर्शन केले आणि प्रत्येक विद्यार्थ्याचा प्रबंध हा स्वतंत्र सिद्धांत आहे.

वयाच्या ३५व्या वर्षी ते केंब्रिज विद्यापीठात लुकाशियन प्राध्यापक बनले. पुर्वी न्यूटन या पदावर विराजमान झाले होते. न्यूटनप्रमाणेचं मोठी प्रसिद्धी लाभलेले स्टिफन हे खऱ्या अर्थाने न्यूटनचे वारसदार बनले. न्यूटनने विश्वातील ग्रहत्रयांच्या गतीचा शोध घेतला तर स्टिफन यांनी या ग्रहताऱ्यांच्या निर्मितीचा शोध घेण्याचा यशस्वी प्रयत्न केला. अपंगत्व आपल्या संशोधनाच्या आड येऊ दिले नाही. शून्यात नजर लावत विश्वाचे कोडे उलगडण्यात म ग्न असणारा, शारीरिक कमतरता यशाआड येऊ शकत नाही असे जगाला पटवून देणारा, अनेकांचे प्रेरणास्थान बनलेला हा संशोधन विश्वातील तळपता तारा १४ मार्च, २०१८ रोजी विझला.... मात्र त्यांचे कार्य आपल्याला सदैव स्मरणात राहील, त्यांची आठवण देत राहील.

15 MAR 2018

पुण्यनगरी


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संशोधकातील शिरोमणी

**आज अवकाशाचा वेध घेणारा संशोधन विश्वातील एक तारा निखळला. स्टिफन हॉकिंग ज्याने मृत्यूला नमवले आणि अवकाशाचा वेध घेत भौतिकशास्त्राचे एक दालन समृद्ध केले, असा असामान्य वैज्ञानिक १४ मार्च रोजी अनंताच्या प्रवासाला निघून गेला.**

हॉकिंग यांचा जन्म ८ जानेवारी, १९४२ रोजी ऑक्सफर्डमध्ये झाला. फ्रँक आणि आयसोबल हॉकिंग यांच्या पोटी जन्मलेले हे बाळ इतरासारखे शालेय शिक्षण संपवून महाविद्यालयीन जीवनात शिरले होते. त्यांच्या शालेय जीवनात त्यांना आईनस्टाईन म्हणत. ते वीस वर्षांचे असताना सर्वसामान्य युवकांसारखा कणखर आणि आनंदी होते. मात्र, अचानक ते आजारी पडले. वैद्यकीय उपचारकामी येत नव्हते आणि २१ व्या वाढदिवशी ८ जानेवारी, १९६३ ला त्यांना मोटर न्यूरॉन डिसीज झाल्याचे निदान झाले. या रोगात हळूहळू स्नायू नियंत्रण हरवत जाते. अशक्तपणा येतो. सर्व हालचाली कमी होत जातात. या आजाराची व्यक्ती फार काळ जगत नाही. हॉकिंगही दोन वर्षे जगतील, असे सांगण्यात आले. हॉकिंग उद्ध्वस्त झाले. मात्र लगेच सावरले. ही दोन वर्षे मजेत जगायचं त्यांनी ठरवले.

त्यांचे अवयव निकामी व्हायला सुरुवात झाली. पुन्हा दवाखान्यात भरती केले. तेथील अन्य लोकांना होणारा त्रास पाहून त्यांनी या आजाराशी लढायचे ठरवले. मग जे येईल ते स्वीकारले. व्हीलचेअर आली. त्यांनी अभ्यासासाठी तिला संगणक जोडून घेतला.




एका बोटाने ते संगणक वापरू लागले. १९८५ मध्ये न्यूमोनिआ झाला आणि त्यांचा आवाज गेला. डेव्हिड मेसन यांनी हॉकिंग यांच्या संगणकासाठी अशी आज्ञावली बनवली की, तिच्या माध्यमातून हॉकिंग बोलू लागले. भाषणे देऊ लागले. अशा अवस्थेत त्यांनी भौतिकशास्त्र आणि रसायनशास्त्राचा अभ्यास केला. केंब्रिजमधील ट्रिनिटी कॉलेजमधून विज्ञानातील पदवी घेतली. या आजाराशी झगडत गणित आणि सैद्धांतिक भौतिकीतील डॉक्टरेट मिळवली. त्यांना पारितोषिकाने सन्मानित करण्यात आले. त्यांनी आईनस्टाईनच्या सापेक्षतावादाच्या सिद्धांताचा अभ्यास केला. सर्व अवयव शाबूत असणाऱ्या माणसाला न सोडवता येणारी गणिते त्यांनी मनात सोडवली. कृष्ण विवरावर विशेष अभ्यास करून ती किरणोत्सार करत असावीत, असा सिद्धांत मांडला. या सिद्धांताला सुरुवातीला विरोध झाला. मात्र, हा सिद्धांत विश्वाने स्वीकारला आणि या उत्सर्जनाला हॉकिंग उत्सर्जन असे त्याला नाव देण्यात आले. भौतिकशास्त्र आणि गणितातील अकरा मूलभूत सिद्धांत त्यांनी मांडले. हे सर्व संशोधन अवकाशाशी निगडित आहे. त्यांच्या या कार्यासाठी नोबेल वगळता अन्य विज्ञानक्षेत्रातील सर्व पुरस्कार देण्यात आले आहेत. त्यांच्या विश्वाच्या प्रसरणाचा सिद्धांत हा खूपच प्रसिद्ध झाला. त्यांनी अकरा विद्यार्थ्यांना डॉक्टरेटसाठी मार्गदर्शन केले आणि प्रत्येक विद्यार्थ्याचा प्रबंध हा स्वतंत्र सिद्धांत आहे.

त्यांनी स्वतंत्रपणे सात पुस्तके लिहिली. सहलेखक म्हणून पाच पुस्तके लिहिली. अनेक ठिकाणी प्रत्यक्ष जाऊन व्याख्याने दिली आणि विज्ञान सर्वसामान्यांच्या भाषेत मांडले. त्यांच्या भाषा आणि विद्वत्तेमुळे त्यांची पुस्तके प्रचंड लोकप्रिय झाली. त्यातील 'अ ब्रिफ हिस्टरी ऑफ टाईम' या पुस्तकाचा बेस्ट सेलर बुक्सच्या यादीत समावेश आहे. सर्व अवयव निकामी होत दोन वर्षात मृत्यू निश्चित आहे, असे सांगणाऱ्या डॉक्टरांचे शब्द खोडत मृत्यूला नमवणारा, सुदृढाला लाजवेल असा अभ्यास आणि संशोधन करणारा, शून्यात नजर लावत अनंताची गणिते सोडवणारा, विकलांग व्यक्ती काय करू शकतो, याचा नवा मानदंड उभारणारा आणि विकलांगांचा प्रेरणास्थान बनलेला हा संशोधकातील शिरोमणी आज १४ मार्च, २०१८ ला निखळला स्वकर्तृत्वाची अमीट छाप ठेवून.

**- डॉ. व्ही. एन. शिंदे**

(लेखक हे विज्ञान लेखक आणि शिवाजी विद्यापीठ येथे उपकुलसचिव आहेत)

15 MAR 2018
लोकमत



## साहित्य भान

प्रा. रणधीर शिंदे

# ए नेशन विदाऊट वूमन

छोटीशी वस्ती. अंधारी रात्र. तरुण स्त्रीच्या प्रसूती वेदनांनी खोलीचा अवकाश व्यापलेला. जवळच्या स्त्रिया लगबगीत. अंगणात दहा-बारा पुरुष चिंताग्रस्त. अचानक बाळाच्या टाहोचा आवाज येतो. आनंदाचे उधाण. एक स्त्री दरवाजात येते आणि सांगते, 'लडकी'. त्याबरोबर एकदम सन्नाटा. चित्र बदलते. आनंद विलय पावतो आणि चेहरे काळे पडतात. दुसऱ्या दिवशीची जीवघेणी शांतता. नदीकाठी ३० ते ४० पुरुष जमलेले. आंब्याच्या पानांच्या तोरणाने सजविलेले शुभ्रधवल फेसाळलेल्या दुधाने भरलेले घंगाळ. त्यावर हातांचे ठसे. वडील चिमुकल्या अर्भकाला दुधात बुडवून मारतात. ही दृश्ये आहेत 'मातृभूमी ए नेशन विदाऊट वूमन' या हिंदी चित्रपटातील. काळजाला चर्रऽऽ.. डागण्या देणाऱ्या पितृप्रधान संस्कृतीच्या विकृत हिंस्र हव्यासाची शोकांत कहाणी सांगितली आहे. बोनी कपूर यांनी या चित्रपटात पुरुषसत्ता आणि अर्थसत्तेच्या दमनाचा सामाजिक आशय मांडलेला आहे. भविष्यात येऊ घातलेल्या जीवघेण्या समस्येचे खोलवरचे दर्शन घडविणारा हा चित्रपट.




एका खेड्यातील शोकांत कहाणी या चित्रपटात आहे. जमीनदारी शेतकरी कुटुंब. घरात पाच तरुण मुलं. लग्नासाठी आसुसलेले, हपापलेले. गावात पंधरा वर्षांत एकही लग्न झालेलं नाही. मुलीच नसतात. पंडिताला शेजारच्या गावात एक किशोरवयीन मुलगी दिसते. तिचे लग्न अनिच्छेने या पाच जणांबरोबर जमविले जाते. पाच लाख आणि पाच गायी असा सौदा ठरतो. तिच्याशी रत होण्यासाठी दिवस ठरवितात. वडीलही सहावे त्यात. आणि सुरु होतो दररोज तिच्या देहाचा इच्छेविरुद्ध अत्याचार. पाचवा भाऊ सूरज तिला आधार देतो. विस्कटलेल्या जगण्यात जीव भरतो. सुखानंदाच्या आशेने ती पालवते. मात्र, तो क्षणिक ठरतो. चारही भाऊ तिरस्काराने लहान्या भावाला मारून टाकतात.

अपार दुःखाच्या कडेलोटातून बाहेर पडण्याचा ती प्रयत्न करते, परंतु ते तिला परत आणतात. गाईच्या गोठ्यात साखळदंडांनी बांधतात. ओणव्या स्थितीत ती जखडल्या अवस्थेत सबंध चित्रपटात पडून असते. तिच्या देहाचे लचके, रक्ताळलेले. ती अपवित्र झाली म्हणून तिला गोठ्यात बांधतात. डोळे प्रेतवत निर्जीव, निचेष्ट. तिला गर्भ राहतो. त्याच्यावर स्वामित्व हक्क सांगण्यासाठी वडील व मुलांत अहमहमिका लागते. स्त्रीसंग नसतानाही आपल्यातील मर्दपणाच्या जाणिवेने बेहोश होतो आणि अर्भकावर हक्क सांगतो. तिला आणण्यासाठी जमाव बाहेर पडतो. आणि तिथे शेवट होतो. या जमावाच्या हिंस्र संघर्षात तिचे चारही पती व इतर अनेक मरण पावतात. इकडे ती प्रसूतीच्या अखेरच्या मरणांतिक यातनेत आहे. एकटीच आहे. बाहेर मरणाचा कडेलोटाचा संघर्ष चालू आहे. आणि बाळाचे बेसूर केविलवाणे स्वर येतात. शेजारीच बाळ उघडे आहे. तीही मुलगीच असते. या दृश्याने चित्रपटाचा शेवट केला आहे. त्यानंतर एक मजकूर येतो. गेल्या शतकभरात ३५० लाख मुली या भारतातून नाहीशा झाल्या आहेत.

अतिशय प्रभावी आणि परिणामकारक असा हा चित्रपट आहे. स्त्री दुःखाच्या आणि शोषणाच्या अनंत मिती त्यामध्ये आहेत. पितृसत्ताक परंपरेतील स्त्रीशोषणाचे, अत्यंत अस्वस्थकारक चित्रण आहे. पुरुषप्रधान कूरतेचे अंतर्भेदी तळठाव घेणारे चित्र आहे. 'एक भी लडकी नही बची' या आधुनिक समाजाच्या शोकात्म विंडबनेचे चित्र या चित्रपटात आहे. तो अतिशय सूचक आणि मौनाच्या भाषेत सादर केला आहे. प्रतीकांच्या वापरातून खोलवरची परिणामकारता प्राप्त करून दिली आहे. स्त्रीचा गाईच्या प्रतीकरूपांत रंगवलेला खेळ अद्भुत आहे. चित्रपटात नायिका सोडून एकही स्त्री दाखविलेली नाही. पुरुषांच्या लैंगिक भूकेच्या हपापलेपणाचे परिणामकारक चित्र, दुसऱ्या बाजूला जे पोटाची भूक जेवणाची त्या कृतीचे अधाशीपणाचे आणि शारीर भुकेचे अत्यंत वेगवान चित्र सादर केले आहे. क्रूरता आणि निःस्तब्धता, पुरुषी दैहिक अत्याचार आणि त्यातला निर्जीवपणा, एकेरी शरीरबोध अशा समांतर मितीचा प्रवेश या चित्रपटात आहे.

(लेखक शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागाचे प्राध्यापक आहेत)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 MAR 2018
महाराष्ट्र टाईम्स

# अभ्यास मंडळावर निवड

**इस्लामपूर :** मालती वसंतदादा पाटील कन्या महाविद्यालयातील कॉमर्स विभागप्रमुख प्रा. डॉ. जे. जी. मुलाणी यांची शिवाजी विद्यापीठाच्या अकौंटन्सी विषयाच्या अभ्यास मंडळ सदस्यपदी तर मानसशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. संजीवनी जगदीश पाटील यांची मानसशास्त्र विषयाच्या अभ्यास मंडळ सदस्यपदी कुलगुरू नियुक्त प्रतिनिधी म्हणून निवड झाली. शिवाजी विद्यापीठाच्या मानसशास्त्र विषयावर अभ्यास मंडळावर निवड झालेल्या डॉ. संजीवनी पाटील या पहिल्या महिला सदस्या आहेत.